## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

### स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीची विशेष 2015

शुक्रवार, दि. १६.१२.२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर निवड करण्यासाठी स्थायी समितीची विशेष सभा, सुरेश काकाणी, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहामध्ये भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन खालील स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते .

सर्व श्री / श्रीमती.

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | शर्मा पुष्पाताई राजेश |
| इशरत फातेमा अ. शमीम | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | देशमुख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | कल्याणकर बालाजी दत्तराव |
| गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल | जाधव जयश्री आनंद |

खालील स्थायी समितीचे सदस्य अनुपस्थितीत होते.

सर्व श्री / श्रीमती

| | |
|---|---|
| फारुख हुसेन कासीम साब | जकीया बेगम स. मुखतार |
| स. जानी म. मासीम | अंजुम बेगम शेख अफरोज |

विषय क्र .1 :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१) व शासन अधिसुचना क्र .बिएनएम-५००७/प्रक्र.१५/नवि-३२ दिनांक १७ फेब्रुवारी २००७ व शासन अधिसुचना क्र .बिएनएम/२००८/ २९५/प्रक.१०६/ २००८/नवि-३२ दिनांक १२ डिसेंबर २००८ मधील नियम ४ (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या निर्वाचीत (१६) सदस्यां मधून स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे बाबत.

नगरसचिव

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे (नियम, २००७ चे नियम २(२) चे सुधारीत तरतुदी प्रमाणे मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्याकरीता या समितीची विशेष सभा घेण्यासाठी दिनांक १६.१२.२०१६ ही तारीख निश्चित करण्यात आली. स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे सुधारीत नियम, २००८ चे नियम ४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेसाठी क्रं. जा.क्रं. २०१६/नपाप्र/ निवडणुक/कावि, दिनांक ०५.१२.२०१६ त्यांचे प्रतिनिधी म्हणून मा. श्री सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी, नांदेड यांना पिठासिन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील तरतूदीनूसार स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दि. ०८.१२.२०१६ रोजी निवडणूक कार्यक्रमासह सभेची नोटीस निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार दि. १५.१२.२०१६ पर्यंत नामनिर्देशनपत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून निर्दिष्ट कालावधीत म्हणजे दिनांक १५.१२.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत स्थायी समितीच्या सभापती पदासाठी सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे व देशमुख मंगला गजानन या दोन उमेदवारांचे चार नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले असुन सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे यांचे दोन्ही नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणून बालाजी दतराव कल्याणकर व अनुमोदक म्हणून जयश्री आनंद जाधव तर देशमुख मंगला गजानन यांचे एका नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणुन शर्मा पुष्पाताई राजेश अनुमोदक म्हणुन मोकले सोनाबाई रामचंद्र तर दुस-या नामनिर्देशपत्रावर सुचक म्हणुन इशरत फातेमा अ. शमीम अनुमोदक म्हणुन तेहरा अनुजा अमितसिंह हे आहेत.

चार हि नामनिर्देशनपत्र छाननीसाठी मा. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

पिठासीन अधिकारी — स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम, २००७ चे नियम क्र. ५ अन्वये नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात येत आहे.

या दोन्ही उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक, अनुमोदक व उमेदवारांच्या स्वाक्षरीत असल्यामूळे **सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे व देशमुख मंगला गजानन** या दोन्ही उमेदवारांचे चार नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहे, घोषित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानूसार वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल तर त्यांना उमेदवारी परत घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. म्हणजेच सकाळी १०.११ ते १०.२६ वाजे पर्यत आपली उमेदवारी परत घेता येईल .

पिठासीन अधिकारी — विहित कालावधीत कोणीही उमेदवारी परत घेतलेली नसल्यामूळे मतदान घेवून सभापतीची निवड करण्यात येईल. सभापती पदासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवाराची नांवे प्रास नामनिर्देशना वरील नांवाच्या वर्णानुक्रमाने लावण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे आहेत.

**देशमुख मंगला गजानन**

**सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे**

पिठासीन अधिकारी — मुंबई प्रातिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम २००७ मधील नियम ६ (३) च्या तरतूदीनूसार हात वर करुन मताची नोंद घेण्यात येईल. नगरसचिवानी मतदान प्रक्रिया संबंधीची माहिती सभागृहात द्यावी.

नगरसचिव — मा.पिठासीन अधिकारी उमेदवाराचे नांव वर्णानुक्रमाने घोषित करतील ज्या उमेदवाराचे नांव पुकारण्यात येईल त्याचेसाठी प्रथम हात वर करुन मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मताची नोंद घेण्यात येईल. व त्यानी ज्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले आहे अशा पालिका सदस्याचे नांवाची नोंद कार्यवृत्तात नोंदविण्यात येईल.

१) मत देण्यास इच्छूक असलेल्या पालिका सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासिन अधिकारी देतील.
२) ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.
३) ज्या पालिका सदस्यानी मतदान केलेले नाही त्याची नोंद देखील कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.
४) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करतील की निवडणूकीचा निकाल चिठया टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकड्न चिठठी काढण्यात येईल.
५) ज्या उमेदवाराचे नांवाची चिठठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवड्न आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील

पिठासीन अधिकारी — आता वर्णानुक्रमाने उमेदवाराचे नांव घोषित करण्यात येतील.

**१) देशमुख मंगला गजानन**

**२) सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे**

प्रथम वर्णनुक्रमानुसार **देशमुख मंगला गजानन** यांना ज्यांना मते द्यावयाची आहे त्यांनी **देशमुख मंगला गजानन** यांना मत दिल्याबध्दल उंच हात वर करुन आपले मत नोंदवावे. त्यानुसार खालील सदस्यांनी देशमुख मंगला गजानन यांच्या बाजुने खालील स. सदस्यांनी हात वर करुन व रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करुन या स. आपले मत नोंदविले आहे.

सर्वश्री / श्रीमती.

१) तेहरा अनुजा अमितसिंह
२) शर्मा पुष्पाताई राजेश
३) इशरत फातेमा अ. शमीम
४) कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम
५) कदम गंगाबाई नारायण
६) चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह
७) मोकले सोनाबाई रामचंद्र
८) देशमुख मंगला गजानन
९) चिखलीकर संदिप सुभाषराव

**पिठासीन अधिकारी**

आता सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे यांना ज्यांना मते द्यावयाची आहे त्यांनी सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे यांना मत दिल्याबध्दल ऊंच हात वर करुन आपले मत नोंदवावे.

त्यानुसार खालील सदस्यांनी सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे यांच्या बाजुने खालील स.सदस्यांनी हात वर करुन व रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करुन या स. आपले मत नोंदविले आहे.

सर्वश्री / श्रीमती.

१) कल्याणकर बालाजी दत्तराव
२) गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल
३) जाधव जयश्री आनंद

खालील सदस्य मतदानाच्या वेळी अनुपस्थित होते.

१) फारुख हुसेन कासीम साब
२) जकीया बेगम स. मुखतार
३) स. जानी म. मासीम
४) अंजुम बेगम शेख अफरोज

मतदान प्रक्रिया चालु असुन वरील सदस्या व्यतिरिक्त सभागृहाच्या बाहेर एकही सदस्य नसल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

**पिठासीन अधिकारी**

मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे.

| | |
|---|---|
| स्थायी समिती मतदाराची सदस्य संख्या | १६ |
| मतदानात भाग घेतलेल्या पालिका सदस्याची संख्या | १२ |
| मतदानात भाग न घेतलेल्या अनुपस्थित सदस्यांची संख्या | ०४ |

उमेदवाराना मिळालेली मते

| | |
|---|---|
| **देशमुख मंगला गजानन** | ०९ |
| **सुंदरलाल किशनलाल गुरुखुदे** | ०३ |

झालेल्या मतदानात सभापती पदासाठी देशमुख मंगला गजानन यांना सर्वात जास्त मते मिळालेली असल्यामूळे स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम (२००७) मधील नियम (७) नूसार त्याची स्थायी समिती सभापती पदावर वैध रीतीने बहुमताने निवड झाल्याचे मी सुरेश काकाणी पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड घोषीत करतो. व आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

( सुरेश काकाणी )
पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड
स्थायी समिती सभापती निवडणूक २०१६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड